# ‘पहावा विठ्ठल’; ‘महाराष्ट्र देशा’ची भटकंती आता संगणकावर

मुंबई, ता. २० : शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांची ‘पहावा विठ्ठल’ आणि ‘महाराष्ट्र देशा’ ही पुस्तके ‘बुकगंगा डॉट कॉम’तर्फे आता ‘ई-बुक’ स्वरूपात उपलब्ध करून दिली जाणार आहेत. अल्प काळात जागतिक स्तरावरील वाचकांपर्यंत चांगले साहित्य पोहोचविणे, हा या उपक्रमाचा हेतू आहे. माटुंगा येथील षण्मुखानंद सभागृहात सोमवारी (ता. २३) होणाऱ्या समारंभात उद्धव ठाकरे यांच्या हस्ते या दोन्ही पुस्तकांच्या ‘ई’ आवृत्तींचे प्रकाशन होईल.

उद्धव ठाकरे यांनी विमानातून केलेले महाराष्ट्रातील गड-दुर्गांचे हवाई छायाचित्रण (एरियल फोटोग्राफी) ‘महाराष्ट्र देशा’ (मराठी आणि इंग्रजी) या ग्रंथात, तर पंढरीच्या वारीचा जिवंत अनुभव ‘पहावा विठ्ठल’ या पुस्तकात आहे. ही दोन्ही पुस्तके ‘बुकगंगा’तर्फे ‘ई-बुक’ स्वरूपात उपलब्ध होणार आहेत. ही दोन्ही ई-पुस्तके जगभरातील वाचकांना संगणकाच्या एका क्लिकवर उपलब्ध होतील.

‘ई-बुक’ एकदा संगणकावर डाऊनलोड केल्यानंतर त्याची प्रिंट काढता येत नाही; अथवा ‘कॉपी’ करता येत नाही. त्यामुळे साहित्य-प्रकाशन क्षेत्रातील ‘पायरसी’ला आळा बसू शकतो. म्हणूनच उद्धव ठाकरे यांच्या पुस्तकांची ई-आवृत्ती प्रकाशित करत असल्याचे ‘बुकगंगा’चे संजय पेठे यांनी सांगितले. मराठी वाचकही आता ‘टेक्नोसॅव्ही’ होत चालला असून, ‘ई-बुक’ घेण्याचे प्रमाण वाढले आहे. ‘